# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ३० एप्रिल २०२५

---

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) : : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेवेतून एक अधिकारी व तीन कर्मचारी मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला.

विद्यापीठाच्या परिक्षा व मुल्यमापन विभागातील सहा.कुलसचिव रमेश पाटील, बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता प्रफुल्ल वाघ, विद्यार्थी विकास विभागातील वरिष्ठ सहाय्यक मच्छिंद्र पाटील, व संशोधन विभगातील कनिष्ठ सहाय्यक श्रावण पाटील हे ४ जण विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झाले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवुन त्यांचा व परिवाराचा गौरव करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील हे उपस्थित होते. यावेळी उमवि शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी संघटना, उमवि मागासवर्गीय कर्मचारी संघटना आणि उमवि शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी पतपेढी यांच्यावतीने देखील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कक्ष अधिकारी प्रवीण चंदनकर यांनी केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. विनोद पाटील)

कुलसचिव